AC – 20.04.2024

Item No. – 5.5 (N) Sem II (1c)

# As Per NEP 2020

# University of Mumbai

| | |
|---|---|
| **Syllabus for Basket of Minor** | |
| **Board of Studies in Marathi** | |
| **UG First Year Programme** | |
| **Semester** | **II** |
| **Title of Paper** | **Credits** |
| **तुकारामांच्या निवडक अभंगांचा अभ्यास** | **2** |
| **From the Academic Year** | **2024-25** |

| Sr | Heading | Particulars |
|---|---|---|
| | Description of course | **तुकारामांच्या निवडक अभंगांचा अभ्यास**<br><br>राष्ट्रीय शैक्षणिक धोरण - २०२०नुसार 'मुख्य अभ्यासक्रम' (Major Course) म्हणून मराठी विषय न निवडलेल्या कला तसेच वाणिज्य, विज्ञान अशा विविध अभ्यासशाखांमधील विद्यार्थ्यांना सत्र दोन ते सत्र सहापर्यंत मराठी विषयाचा 'Minor course' निवडण्याचे स्वातंत्र्य आहे. यानुसार प्रथम वर्ष बी.ए. मराठी Minor या विषयासाठी शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून 'तुकारामांच्या निवडक अभंगांचा अभ्यास' ही अभ्यासपत्रिका नेमलेली आहे. या अभ्यासपत्रिकेअंतर्गत तुकारामांच्या निवडक पंधरा अभंगांचा समावेश केला आहे.<br><br>१७ व्या शतकात तुकारामांनी लिहिलेले अभंग महाराष्ट्र आणि मराठी संस्कृतीचा चिकित्सक अभ्यास करण्याची प्रेरणा निर्माण करणारे आहेत. तत्कालीन सामाजिक-सांस्कृतिक स्थितीगतीवर आणि मानवी वर्तन-व्यवहारावर भाष्य करणारे हे अभंग सद्यकालीन प्रश्नांच्या संदर्भात विचारप्रवर्तक ठरतात. यादृष्टीने तुकारामांच्या अभंगांतील उत्कट भावाभिव्यक्ती आणि समाजमनाला कृतिप्रवण करण्याचे आवाहन यांच्या अभ्यासाद्वारे तुकारामांच्या अभंगांतील मूल्यदृष्टीचा अभ्यास करणे व विद्यार्थ्यांची काव्यविषयक आणि समाजविषयक जाणीव घडवणे या उद्देशाने ही अभ्यासपत्रिका नेमलेली आहे. |
| | Vertical | Minor |
| | Type | Theory |
| | Credit | 02 (1 credit = 15 Hours for Theory in a semester) |
| | Hours Allotted | 30 |
| | Marks Allotted | 50 |
| | Course Objectives | १. विद्यार्थ्यांना तुकारामपूर्व व तुकारामकालीन महाराष्ट्र आणि मराठी साहित्य परंपरेचा परिचय करून देणे.<br>२. मराठी भाषेतील ओवी आणि अभंग या छंदांची ओळख करून देत त्यांचे महत्त्व सांगणे.<br>३. तुकारामांच्या निवडक अभंगांच्याद्वारे त्यांच्या काव्याचे स्वरूप व विशेष अभ्यासणे.<br>४. तुकारामांच्या अभंगरचनेचे सामाजिकदृष्ट्या महत्त्व व कालोचितता सांगून त्यांच्या काव्यदृष्टीची व मूल्यदृष्टीची जाणीव करून देणे.<br>५. मध्ययुगीन मराठी साहित्याविषयी रुची निर्माण करून विद्यार्थ्यांचे समाजभान विकसित करणे. |

|  |  |  |
|---|---|---|
|  | Course Outcomes | १. विद्यार्थ्यांना तुकारामपूर्व व तुकारामकालीन महाराष्ट्र आणि मराठी साहित्य परंपरेचा परिचय होईल.<br>२. मराठी भाषेतील ओवी आणि अभंग या छंदांची ओळख होईल व त्यांचे महत्त्व लक्षात येईल.<br>३. तुकारामांच्या निवडक अभंगांच्याद्वारे त्यांच्या काव्याच्या स्वरूप व विशेषांचे आकलन होईल.<br>४. तुकारामांच्या अभंगरचनेचे सामाजिकदृष्ट्या महत्त्व व कालोचितता लक्षात येऊन त्यांच्या काव्यदृष्टीची व मूल्यदृष्टीची जाणीव होईल.<br>५. मध्ययुगीन मराठी साहित्याविषयी रुची निर्माण होईल आणि विद्यार्थ्यांचे समाजभान विकसित होईल. |
| ६. | Modules | **घटक एक :**<br>अ) तुकारामपूर्व व तुकारामकालीन महाराष्ट्र आणि मराठी साहित्य परंपरेचा थोडक्यात परिचय.<br>ब) ओवी आणि अभंग या मराठी छंदांचे स्वरूप व महत्त्व<br>(६० मिनिटांच्या १५ तासिका) श्रेयांकन १.<br><br>**घटक दोन :**<br>तुकारामांचा परिचय आणि खालील **निवडक पंधरा** अभंगांचा अभ्यास.<br>१)आम्हा घरी धन शब्दांचीच रत्ने २)कन्या सासुरासी जाये ३)अणुरेणुया थोकडा ४) ओले मूळ भेदी ५) अर्थेविण पाठांतर कसाया करावे ६) जोडोनिया धन उत्तम व्यवहारे ७)पापाची वासना नको दावू डोळा ८) बोले तैसा चाले ९) जे का रंजले गांजले १०) मऊ मेणाहून ११)टिळा टोपी माळा देवाचे गबाळे १२)ऐसे कैसे जाले भोंदू १३)उंच नीच कांही नेणे भगवंत १४) बुडती हे जन १५) काय करू आता धरूनिया भीड.<br>(६० मिनिटांच्या १५ तासिका) श्रेयांकन १. |
| ७. | Text books | N.A. |
| ८. | Reference books | संदर्भसूची :<br>१. श्री तुकारामबावांच्या अभंगांची गाथा -महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई,१९५५ (द्वितीय आवृत्ती)<br>२. मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड २- महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे<br>३. तुकाराम - भालचंद्र नेमाडे, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, १९९७(द्वितीय आवृत्ती)<br>४. विद्रोही तुकाराम- डॉ. आ.ह.साळुंखे, प्रकाशक गोपाळ मोकाशी, सदाशिव बागाईतकर स्मृतिमाला, पुणे, १९९९(द्वितीय आवृत्ती)<br>५. पुन्हा तुकाराम -दि.पु.चित्रे, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई. |

| | | |
|---|---|---|
| | | ६. तुका म्हणे - सदानंद मोरे, उत्कर्ष प्रकाशन, पुणे, २००१.<br>७. तुकाराम दर्शन-सदानंद मोरे, सकाळ प्रकाशन, पुणे.<br>८. आनंदाचा डोह -रा.ग.जाधव, कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे, १९८६(द्वितीय आवृत्ती)<br>९. तुका म्हणे भाग- एक संत तुकारामांच्या निवडक अभंगांचे निरुपण, डॉ. दिलीप धोंगडे, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, २०१२.<br>१०. तुका म्हणे भाग- २ संत तुकारामांच्या निवडक अभंगांचे निरुपण, डॉ. दिलीप धोंगडे, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, २०१२.<br>११. अभंग: स्वरूप आणि चिकित्सा (प्राचीन ते अर्वाचीन ) खंड १ व २ - प्रा. डॉ. बाळासाहेब लबडे , यशोदीप प्रकाशन, पुणे,२०१३. |
| ९. | Internal Continuous Assessment: 40% | Semester End Examination: 60% (वेळ एक तास) |
| १०. | **अंतर्गत चाचणी परीक्षा : २० गुण**<br>● चाचणी परीक्षा : प्रत्यक्ष उपस्थिती / ऑनलाईन - २० गुण | |
| ११. | बहिर्गत परीक्षा ३० गुण (वेळ एक तास)<br>● एकूण तीन प्रश्न विचारावेत.<br>● प्रत्येक घटकावर अंतर्गत पर्याय असलेले प्रत्येकी १० गुणांचे दोन प्रश्न विचारावेत.<br>● तिसरा प्रश्न हा घटक १ आणि २ वर आधारित दहा गुणांचा वस्तुनिष्ठ स्वरूपाचा असावा. | |

Sign of the BOS Chairman

Name of the Chairman: **Prof. Satish Kamat**

Name of the BOS: **Marathi**

Sign of the Offg. Associate Dean

Name of the Associate Dean: **Prin. Dr. Suchitra Naik**

Name of the Faculty: **Humanities**

Sign of the Offg. Dean

Name of the Offg. Dean: **Prin. Dr. Anil Singh**

Name of the Faculty**:** **Humanities**